एस.सी.सी. २८४/२०२१
सरकार वि. कमल खरात
निशाणी ३०

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ३ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव — बारकु बाळू गोंदे, वय — ५० वर्षे,
व्यवसाय — पोलीस हवालदार, राहणार — राजुर,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. सन २०२० मध्ये मी पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. मला गुन्हा रजिस्टर क्रमांक ५४९/२०२० कलम ६५ई चा तपास सोपवण्यात आला होता. सदरचा तपास हा हवालदार पालवे यांच्याकडे होता. ते मयत झाल्यानंतर तोंडी आदेशाने सदर गुन्ह्याचा तपास माझ्याकडे देण्यात आला होता. पकडलेली दारू ही रासायनिक विश्लेषणाकरीता पाठवली होती त्याचा रासायनिक विश्लेषणाचा अहवाल हस्तगत करून तो कागदपत्रात समाविष्ट केला. आता मला सदर रासायनिक विश्लेषणाच्या अहवालाची मुळ प्रत दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास **निशाणी ३१** देण्यात येते. तपास पुर्ण करून आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीस ओळखतो. ती आजरोजी न्यायालयात हजर नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. टी. एस. फापाळे यांच्या मार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांनी मला सदर गुन्ह्याचा तपास करण्याचा तोंडी आदेश दिला होता हे मी खोटे सांगत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रासायनिक विश्लेषणाकरीता पाठवलेल्या दारूचा रासायनिक विश्लेषणाचा अहवाल हस्तगत केला हे मी खोटे सांगत आहे. मी साक्षीदारांचे

जाब–जबाब नोंदवले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणात मी कोणतीही चौकशी न करता खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.11.17 18:11:02 +0530

दिनांक १७.११.२०२५ **( अनंत रा. टेंगसे )**
अकोले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.